# शालेय पोषण आहार, वसतिगृह, आश्रमशाळा, रुग्णालयांना गॅस पुरवठा अविरत ठेवा: विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकरांचे निर्देश

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात पुरेसा गॅस उपलब्ध आहे. तथापि,शालेय विद्यार्थ्यांना दिला जाणारा मध्यान्न पोषण आहार, आदिवासी विकास विभागाची, सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहाची तसेच आश्रमशाळांची भोजनालये, रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या अन्नपदार्थांसाठी स्वयंपाकाचा गॅस अविरत उपलब्ध ठेवावा, असे निर्देश आज विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी गॅस वितरण कंपनीला दिले. हे वितरण सुरळीत सुरु रहावे याबाबत पुरवठा विभागाने देखरेख ठेवावी,असेही निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यात गॅस तुटवड्याच्या अफवांमुळे लोकांनी गॅस एजन्सी समोर रांगा लावल्याचे




निदर्शनास आले. याबाबत आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्वच गॅस वितरण एजन्सीच्या तपासण्या करण्याचे निर्देश पुरवठा विभागाला दिले. त्यानुसार गॅस वितरकांकडे जाऊन तपासण्या केल्या. जिल्ह्यात यासाठी ११ पथके नियुक्त करण्यात आले होते. त्यात गोडावून तपासणी, वितरण प्रणाली तपासणी, बुकींग ते प्रत्यक्ष सिलिंडर ग्राहकांना देणे यात कोणतीही अनियमितता, साठेबाजी होऊ नये, यासाठी तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार आज जिल्हाभरात या तपासण्या झाल्या. जिल्ह्यात घरगुती गॅसचा पुरेसा साठा असून विहित केलेल्या मुदतीत बुकींग केल्यापासून सिलिंडर ग्राहकांना मिळेल, असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले. दुपारनंतर जिल्हाधिकारी कार्यालयात उद्योजक संघटना, पुरवठा विभाग, गॅस वितरक कंपनी, शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, उच्च शिक्षण विभाग आदींची संयुक्त बैठक घेण्यात आली. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग चेतना मोरे, सहा. प्रकल्प अधिकारी डॉ उद्धव वायाळ, सामाजिक न्याय विभागाचे सहा. आयुक्त रविंद्र शिंदे, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.चे शुभम चौहान, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.चे नितीन बजाज, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, ऑरिक सिटीचे महेश शिंदे, मसिआ चे अध्यक्ष अर्जून गायकवाड, कार्यकारी अभियंता रमेशचंद्र गिरी, तसेच अन्य विभागाचे अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते. उद्योगांना गॅस पुरवठा करण्याबाबत प्राधान्यक्रम ठरवून नेमके काय धोरण असावे? याबाबत शासनास उद्योजक संघटनांच्या निवेदनासह प्रस्ताव पाठविण्यात येईल. रुग्णालयांना अत्यावश्यक साहित्य, पदार्थ देणारे उद्योग आहेत. अशा उद्योगांना आवश्यकतेनुसार गॅस पुरवठा करता यावा यासाठी तरतूद असावी,अशी मागणी संघटनांच्या प्रतिनिधींनी केली. त्यांचे म्हणणे शासनास कळवावे,असे निर्देश पापळकर यांनी दिले.

## गायरान इनामी प्लॉट धारकांना पीटीआर द्यावेत व आशा पी टी आर धारकांना घरकुल द्यावेत

### संजय होळकर यांची मुख्य अधिकारी यांच्याकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात गायरान व इनामी प्लॉट धारक आहेत व ते त्या प्लॉटवर पत्र्याचे शेड किंवा कच्चे घर तयार करून राहत आहेत त्यांना घरकुल योजनेतून हक्काचे घर मिळावे म्हणून मागील काही वर्षांपूर्वी जननगरसेवक संजय बाबुराव होळकर यांनी मागणी केल्याप्रमाणे गायरान प्लॉट वरील रहिवाशांना त्यांच्या नावाची पीटीआर वर नोंद घेऊन पीटीआर देण्यात आले होते तसेच आशा गायरान व इनामी प्लॉटच्या पीटीआरवर घरकुल देखील देण्याची मागणी संजय होळकर यांनी केली होती त्याप्रमाणे अशा रहिवाशी यांना घरकुल देखील देण्यात आले आहेत. महत्त्वाचे म्हणजे बीड प्रमाणेच गेवराई



शहरातील अचानक नगर व इतर ठिकाणच्या अशा प्लॉट धारकांना देखील नगरसेवक संजय होळकर यांनी मोर्चा काढून आंदोलन करून सरकारी दरबारी लढा देऊन पीटीआर मिळवून दिलेले असून बीड शहरातील अशा गायरान व इनामी प्लॉट वरील असंख्य प्लॉट धारकांची नोंद घेतलेली नाही त्यांना पीटीआर दिलेले नाहीत तसेच बर्याच गायरान व इनामी प्लॉट धारकांकडे पीटीआर असून देखील त्यांना घरकुल मंजूरी देणे गेल्या काही महिन्यांपासून थांबवलेली आहे त्यामुळे अशा उर्वरित लोकांना पीटीआर द्यावेत व ज्यांना पीटीआर मिळालेले असून घरकुल मिळणे बाकी आहे त्यांना शासनाच्या महत्त्वकांक्षी घरकुल योजने पासून वंचित ठेवू नये व या प्रमाणे घरकुल मंजुरी द्यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे जन नगरसेवक संजय होळकर यांनी जिल्हा अधिकारी विवेक जॉन्सन व मुख्य अधिकारी नगरपरिषद शैलेश फडसे बीड यांच्याकडे केली आहे.

## आध्यात्मिक प्रगती, सकारात्मक जीवनशैली, समृद्धीचे रहस्य उलगडण्यासाठी बीडमध्ये 'कुबेर का खजाना' परिसंवादाचे आयोजन

### बीड जिल्ह्यासह शहरवासीयांनी लाभ घेण्याचे आयोजकांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जीवनातील नकारात्मकता दूर करून यशाच्या शिखराकडे जाण्यासाठी बीड 'नारायण रेकी सत्संग' परिवाराच्यावतीने बीड जिल्हावासीयांसाठी एक प्रेरणादायी आध्यात्मिक सोहळा अयोजित करण्यात आला असून याचा बीड जिल्हा वासीयांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

बीड नारायण रेकी सत्संग परिवार, बीड यांच्या वतीने नारिरत्न आग्रशिरोमणी व जागतिक विक्रमादित्य जीवन परिवर्तन वक्ता श्रीमती राजेश्वरजी मोदी (राज दीदी) यांच्या मार्गदर्शनाखाली 'कुबेर का खजाना' या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात राज दीदी त्यांच्या सुमधूर वाणीतून सकारात्मक विचार, आध्यात्मिक उन्नती तसेच जीवनात समृद्धी कशी साध्य करावी यावर त्या मार्गदर्शन करणार आहेत. हा परिसंवाद सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.०० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. शहरातील एम.आय.डी.सी.भागातील मॉ वैष्णो पॅलेस,या ठिकाणी हा विशेष परिसंवाद कार्यक्रम संपन्न होणार आहे. सदर परिसंवादासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात आले असून कार्यक्रमाच्या नियोजनासाठी व यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

# पोलिसांवर धारदार वस्तू व दगडाने हल्ला केल्याच्या आरोपातून बाळासाहेब मोरे सह तिघांची निर्दोष मुक्तता

### सेशन केस क्र. २११/२०१९ मध्ये सत्र न्यायालयाचा निकाल; आरोपीतर्फे – ॲड. योगेश टेकाडे

**बीड । प्रतिनिधी**

पोलिसांवर धारदार वस्तू व दगडाने हल्ला करून सरकारी कामात अडथळा आणल्याच्या आरोपाखाली दाखल करण्यात आलेल्या सेशन केस क्र. २११/२०१९ या प्रकरणात येथील सत्र न्यायालयाने आरोपी बाळासाहेब उर्फ बाळू मोरे, मधुकर काटवटे व आत्माराम कवडे यांची निर्दोष मुक्तता केली. सदर निकाल सत्र न्यायाधीश राजेश नेरलेकर यांनी दिला.

या प्रकरणातील फिर्यादी पोलीस कर्मचारी अर्जुन राख (ब.न. १०२८) हे त्यावेळी चौसाळा येथे कार्यरत होते. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १३ मे २००९ रोजी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी पथकासह नेकनूर परिसरात गस्त घालत असताना पारगावकडून येणारी कमांडर जीप (क्र. चक-२३-ए-१७२) ही वाहनात मोठ्या प्रमाणात प्रवासी बसवून तसेच काही प्रवासी पाठीमागे लटकावून अवैधरित्या प्रवासी वाहतूक करताना दिसली. त्यामुळे संबंधित वाहन चालकास थांबवून ती जीप पोलीस चौकी नेकनूर येथे आणण्यात आली.

फिर्यादीनुसार, त्यानंतर सुमारे १२.०० वाजण्याच्या सुमारास जीपमधील काही प्रवासी



तसेच त्यांच्या सोबत आलेल्या इतरांनी चौकीसमोर येऊन वाद घातला. त्यावेळी आरोपी बाळू मोरे पुढे येऊन तू आमची गाडी चौकीला कशी काय आणली असे म्हणत फिर्यादीचे गचोरे धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याच्यासोबत आलेल्या इतरांनीही अचानक हल्ला करत लाथाबुक्के, दगड तसेच धारदार वस्तूने मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या गणवेशाचा शर्ट फाटला तसेच खांद्यावरील शोल्डर पट्टी तुटली व त्यांना दुखापत झाली. या घटनेमुळे सरकारी कामात अडथळा निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला.

या घटनेनंतर पोलिसांनी आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३३२, ३५३, ३२३ व ५०४ अन्वये गुन्हा नोंद करून तपास सुरू केला. तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल केले. पुढे हा खटला सत्र न्यायालयात चालविण्यात आला. सुनावणीदरम्यान अभियोजन पक्षाकडून एकूण नऊ साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली तसेच विविध कागदपत्रे न्यायालयासमोर सादर करण्यात आली. मात्र खटल्याच्या सुनावणीदरम्यान साक्षीदारांच्या जबाबात अनेक विसंगती आढळून आल्या तसेच अभियोजन पक्षाने सादर केलेला पुरावा आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यास अपुरा असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे न्यायालयाने आरोपींना लशपशषळीं ष वींलीं (संशयाचा फायदा) देत आरोपी बाळासाहेब मोरे, मधुकर काटवटे व आत्माराम कवडे यांची निर्दोष मुक्तता केली.

या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. योगेश टेकाडे यांनी आरोपींची बाजू भक्कमपणे मांडत सरकारी पक्षाच्या पुराव्यातील त्रुटी, साक्षीदारांच्या जबाबातील विसंगती तसेच तपासातील उणिवा न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यांच्या प्रभावी युक्तिवादाचा विचार करून न्यायालयाने आरोपींना संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्त केले. या कामकाजात ॲड. वैभव होळकर, ॲड. मोनाली सोनवणे व ॲड. अक्षय जाधव यांनी सहकार्य केले. त्यामुळे या प्रकरणातील प्रभावी वकिलीबद्दल ॲड. योगेश टेकाडे यांचे कायदेवर्तुळात कौतुक होत आहे.

# गावागावात 'ॲग्री क्लिनिक' सुरु करा पंतप्रधानकडे मागणी: सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे

### शेतकर्यांना वैज्ञानिक मार्गदर्शन मिळावे यासाठी पुढाकार घेवून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्यामार्फत पंतप्रधानांना निवेदन

**लातूर । प्रतिनिधी**

शेतकर्यांना आधुनिक व वैज्ञानिक शेतीचे मार्गदर्शन मिळावे तसेच शेती उत्पादनात वाढ व्हावी, या उद्देशाने लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते संजय नागनाथ राजुळे यांनी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पाठवले आहे.




निवेदनामध्ये प्रत्येक गाव पातळीवर, गाव समूह पातळीवर, मंडळ पातळीवर आणि तालुका पातळीवर 'ग्री क्लिनिक' अथवा कृषी सल्ला केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या अनेक शेतकर्यांना मातीची गुणवत्ता, खतांचा योग्य वापर, पिकांवरील रोग-कीड नियंत्रण तसेच औषधांची अचूक मात्रा याबाबत वैज्ञानिक माहिती वेळेवर मिळत नसल्यामुळे शेती उत्पादनावर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शासनाने बी.एससी. ग्रीकल्चर, कृषी डिप्लोमा किंवा कृषी शिक्षण घेतलेल्या युवकांना 'ग्री क्लिनिक' सुरू करण्यास परवानगी द्यावी, अशीही मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. या केंद्रांद्वारे माती परीक्षण, योग्य खतांची शिफारस, रोग-कीड नियंत्रण, औषधांचा अचूक वापर तसेच उत्पादन वाढीसाठी वैज्ञानिक मार्गदर्शन शेतकर्यांना देता येईल, असेही निवेदनात म्हटले आहे. या संदर्भात पंतप्रधानांसोबतच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , राज्याचे उपमुख्यमंत्री, भारत सरकारचे कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तसेच लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनाही निवेदन देण्यात आले आहे. यावेळी संपादक दत्तात्रय परळकर आणि वीरभद्र बाबुराव गोगे उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३५४ / २०२६**

**प्रशांतव इतर वि. निरंक**

अर्जदार- **१. प्रशांत पि. केरबा यादव, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. कुर्ला, ता. जि. बीड. २. स्मिता पि. केरबा यादव, वय ३९ वर्षे, धदा घरकाम, रा. कुर्ला, ता. जि. बीड. ३. राणी भ्र. शिवाजी रोकडे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. कारखाना कॉलनी परिसर, अशोक नगर, श्रीरामपुर, निपाणी वडगाव जि. अहिल्यानगर.** विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत केरबा पि. रावसाहेब यादव व शालनबाई भ्र. केरबा यादव यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी १. केरबा पि. रावसाहेब यादव हे दिनांक दि. १५/११/२०२० रोजी कुर्ला ता. जिल्हा बीड येथे व २. शालनबाई भ्र. केरबा यादव हया दिनांक १७/१०/२०२२ रोजी शासकीय रुग्णालय बीड ता. जि. बीड येथे मयत झालल्या असून अर्जदार मयत केरबा पि. रावसाहेब यादव व शालनबाई भ्र. केरबा यादव यांचे नातेवाईक आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबददूल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत केरबा पि. रावसाहेब यादव व शालनबाई भ्र. केरबा यादव यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी.

आज दिनांक १२ माहे ०३ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४ / ०५ / २०२६ आहे.

**(ऍड एस बुंदेले यांच्यामार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३५८/२०२६**

**रमेश पि. परमेश्वर जाधव व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :-**१. रमेश पि. परमेश्वर जाधव, वय-५२, वर्षे, धंदा- शेती, रा. लोणी (घाट) ता. जि. बीड. २. संभाजी पि. परमेश्वर जाधव, वय- ४९, वर्षे, धंदा- शेती, रा. लोणी (घाट) ता. जि. बीड, ह. मु. फलॅट नं.९, अंजिक्यश्री अर्पाटमेन्ट, सुखसागर नगर, पार्ट-२ गल्ली नं. २ कात्रज पुणे, ता. जि. पुणे. ३. शिवाजी पि. परमेश्वर जाधव, वय ४५, वर्षे, धंदा- शेती, रा. लोणी (घाट) ता. जि. बीड, ह. मु. सर्व्हे नं. ३९२, प्रेमनगर वसाहत, बालाजी प्रोव्हीजन स्टोअर जवळ, मार्केट यार्ड, पुणे. ता. जि. पुणे.** विरुध्द

निरंक

(अर्जदार हे भारतीय आहेत)

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत परमेश्वर पि. केशव जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत परमेश्वर पि. केशव जाधव यांचा मृत्यु दिनांक २३.०४.२०२३ रोजी राहते ६ री, मौजे लोणी घाट, ता. जि. बीड येथे झालेला असुन अर्जदार क १ते३ हे मयताचे मुले आहेत. मयतास मुलगी नाही. मयताची पत्नी नामे कैकयी भ्र. परमेश्वर जाधव हया दिनांक ०९.०४.२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. मयताचे आई, वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत परमेश्वर पि. केशव जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १३ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८ एप्रिल २०२६

**(ॲड. एस बी नांदे यांच्यामार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २२३/२०२६**

**संभाजी जाधव वि. निरंक**

यापेक्षा भागुजी खुदाजी उर्फ सुदाजी जाधव, हे दिनांक ०९/०३/२०२६ रोजी सोनपेठवाडी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे. आणि तसेच अर्जदार-

**१. संभाजी पि भागुजी जाधव, वय ५७ वर्षे, धंदा, शेती, रा. मु. सोनपटवाडी, ता. जि. बीड. २. बबन पि भागुजी जाधव, वय, ५५ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. महोदय पि भागुजी जाधव, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. दत्तु पि भागुजी जाधव, वय ४५ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे.**

अर्जदार क्र. १ ते ४ हे मयताचे मुले आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही, वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे भागुजी खुदाजी उर्फ सुदाजी जाधव, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०४/०४/२०२६ ही आहे.**

आज दिनांक १३ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**(ॲड. जी. एस. घुगे यांचे मार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९९२/२०२५**

**-- वि. निरंक**

यापेक्षा **भिमराव पि. गणपती शिंदे**, हे दिनांक ११/०९/२०२५ रोजी बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे. आणि तसेच अर्जदार-

**१. शोभा भ्र. भिमराव शिंदे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा.बजरंग नगर, कॅनॉल रोड, बीड ता.जि.बीड, २. आकाश पि. भिमराव शिंदे, वय २९ वर्षे धंदा शिक्षण, रा.वरीलप्रमाणे, ३. दिपक पि. भिमराव शिंदे, वय २८ वर्षे धंदा शिक्षण, रा.वरीलप्रमाणे, ४. सौ. पायल भ्र. किरण कदम, वय २३ वर्षे, धंदा घरकाम, रा. सौदाण, ता. पाटोदा जि.बीड**

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क्र. २ व हे मयताचे मुले आहेत अर्जदार ४ मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हा जालन्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट, सदर अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु **भिमराव पि. गणपती शिंदे,** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २०/०४ / २०२६ ही आहे.

आज दिनांक १३ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३३९/२०२६**

अर्जदार- **(१) अनुसया भ्र. गणेश बन्सड, वय २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. मौजवाडी ता. जि. बीड. (२) श्रुती पि. गणेश बन्सड अ.पा. क आई अर्जदार क्र. १ वय ०५ वर्षे, रा. मौजवाडी ता. जि. बीड. (३) रूद्रा पि. गणेश बन्सड अ.पा.क आई अर्जदार क्र. १ वय ०३ वर्षे, रा. मौजवाडी ता. जि. बीड.**

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे गणेश पि. लक्ष्मण बन्सड यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे गणेश पि. लक्ष्मण वन्स, रा. मौजवाडी, ता. जि. बीड हे दिनांक २१/०१/२०२६ रोजी जिल्हा रूग्णालय, बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार क. ३ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क. २ व ३ हे अज्ञान असून त्यांची अज्ञान पालनकर्ती आई अर्जदार क. १ ही आहे. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक ३०/०३/२०२६**

आज दिनांक १३/०३/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(ॲड. गडकर एम. ए.)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २८/२०२६**

**जयराम दत्ताराय शिंदे विरुध्द ग्रा.प.कार्या.चौसाळा**

**पहा,**

**१. जयराम दत्ताराय शिंदे, रा.चौसाळा बीड, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत दत्तात्रय निर्वत्ती शिंदे यांचा दिनांक १९/१२/२०२३ रोजी मृत्यू झालेला** असून त्यांचे मृत्यू नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **चौसाळा** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **चौसाळा** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०९/०४/२०२६ ही आहे.

**शिक्का**

**(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार दि. १४ मार्च २०२६ •


## थोडक्यात...

### कुलदीप साखरे यांना रसायनशास्त्रामध्ये पीएच.डी. पदवी प्रदान



बीड । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचा संशोधक विद्यार्थी कुलदीप साखरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे. कुलदीप साखरे यांनी स्पेक्ट्रोस्कोपिक अँड बायोलॉजिकल स्टडीज ऑन मेटल कॉम्प्लेक्स ऑफ पोटेन्शियल अ‍ॅक्टिव्ह ऑक्सिजन नायट्रोजन/सल्फर डोनर लिगॅन्डस या विषयावर बलभीम महाविद्यालय, बीड च्या रसायनशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ. महादेव साखरे यांच्या मार्गदर्शनात विद्यापीठास प्रबंध सादर केला होता. कुलदीप साखरे यांनी त्यांचे संशोधन कार्य उत्कृष्ठ दर्जाच्या इम्पॅक्ट फॅक्टर असणाऱ्या जागतिक स्तरावरील विविध जर्नल मध्ये संशोधक मार्गदर्शक प्रोफेसर डॉ महादेव साखरे यांच्या मार्गदर्शनात प्रसिद्ध केले आहे.

### प्रा. विक्रम इनकर यांना विद्यावाचस्पती (Ph.D) पदवी प्रदान



नेकनूर । प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ, केज संचलित, प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, नेकनुर येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. विक्रम इनकर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मानव्यविद्याशाखा अंतर्गत 'महाराष्ट्रातील जातीय हिंसाचार एक चिकित्सक अभ्यास' या विषयामध्ये विद्यावाचस्पती ( पीएच.डी ) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना संशोधनासाठी डॉ. सुनिल पिंपळे यांनी मार्गदर्शन केले. यांच्या यशाबद्दल माऊली विद्यापीठ, केज संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. अशोकराव पाटील साहेब , संस्थापक सचिव मा. खा. रजनीताई पाटील साहेब , संस्थेचे सचिव मा. आदित्यदादा पाटील साहेब , संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा. प्रतापराव मोरे सर , मा. नवनाथराव थोटे साहेब , मा. श्रीरंग निंबाळकर सर , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . ढास डी.के. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व मित्र परिवारांनी त्यांच्या या यशा बाबत अभिनंदन केले व पुढील संशोधन कार्यास शुभेच्छा दिल्या.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या योजना केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी...

## आ.सुरेश धस यांनी घेतली दीपा मुधोळ मुंडे यांची भेट..

आष्टी । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळाची स्थापना होऊन चार वर्षे झाले आहेत या महामंडळाच्या वतीने ऊस तोडणी कामगारांसाठीच्या योजना आणि त्याची अंमलबजावणी अत्यंत मंद गतीने होत असून या योजना केवळ कागदोपत्री न राहता या योजना ऊस तोडणी कामगारांच्या जीवनाशी संबंधित आहेत शासनाचा शुद्ध हेतू हा ऊस तोडणी कामगारांच्या जीवनामध्ये परिवर्तन व्हावा असा असून या योजनांचा पात्र लाभार्थ्यांना फायदा व्हावा अशी आग्रही मागणी आमदार सुरेश धस यांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार नुकताच त्यांनी घेतला आहे. या महामंडळाची स्थापना सन २०२२ मध्ये होऊन या मंडळाच्या माध्यमातून ऊस तोडणी कामगारांची नोंदणी, ओळखपत्र, मुलांच्या शैक्षणिक सुविधा, वस्तीगृह, ऊस तोडणी कामगारांना अपघाती विमा, गळीत हंगाम कालावधीमध्ये कामगारांसह बैलांचा अपघात त्यानंतर मृत्यू झाल्यानंतर दिले जाणारे सानुग्रह अनुदान, तसेच ऊस तोडणी कामगार महिला भगिनींना आरोग्य विषयक सेवा सुविधा, गर्भधारणा कालावधीमध्ये त्यांना सकस आहार, गळीत हंगाम कालावधीमध्ये सेंट्रलाइज किचनच्या माध्यमातून मजुरांना बांधकाम कामगार यांच्या धर्तीवर सकाळी ताजा जेवणाचा डबा मिळावा.. अशा प्रकारच्या नावीन्यपूर्ण योजना राबविणे आवश्यक होते. परंतु अद्यापही या महामंडळा द्वारा प्रभावीपणे योजना राबवल्या जात नाहीत मागील दोन ते तीन वर्षापासून बीड जिल्ह्यात अनेक ऊसतोड कामगारांचे अपघात झाले ५० पेक्षा जास्त कामगारांचा मृत्यू झाला परंतु अद्यापही त्यांना विमा आणि सानुग्रह अनुदान देण्यात आलेले नाही. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून मागील दोन-तीन वर्षांमध्ये वस्तीगृह बांधकाम, मध्यवर्ती कार्यालय बांधकाम, विभागीय कार्यालय दुरुस्ती, पाणी फिल्टर, ओळखपत्र,



आनंदाचा शिधावाटप करणे या योजनांच्या कोट्यावधी रुपयांच्या निविदा प्रक्रिया राबवल्या गेल्या आहेत या योजना कागदोपत्री आहेत की ? त्याची अंमलबजावणीची स्थिती काय आहे ? याचाही आढावा घेण्याची आमदार सुरेश धस यांनी मागणी केली आहे. यावेळी त्यांच्यासोबत कामगार कल्याण मंडळाचे श्री केंद्रे साहेब आणि ऊस तोडणी कामगारांच्या अपघात व विमा वैद्यकीय उपचारासाठी सक्रिय असणारे बीड येथील श्री बबन माने उपस्थित होते

# मतदारांनी 2002 च्या यादीशी लिंक प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी

## मतदान प्रक्रिया सुलभ करण्यासाठी बीएलओ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन: सभापती निजाम शेख यांची नागरिकांना सूचना

बीड । प्रतिनिधी

मतदार यादी अचूक आणि अद्ययावत राहावी तसेच आगामी निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मतदारांची माहिती २००२ मधील मतदार यादीशी लिंक करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व मतदारांनी आपल्या प्रभागातील बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांच्याशी तात्काळ संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन नगरपरिषदेचे सभापती निजाम शेख यांनी केले आहे.

मतदार यादीतील माहिती योग्य व अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा मतदार यादीत पत्ता बदल, नावातील चुका किंवा प्रभागातील बदल यामुळे मतदानाच्या वेळी मतदारांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे



अशा अडचणी टाळण्यासाठी नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन मतदार यादीतील माहिती तपासून घ्यावी आणि आवश्यक असल्यास त्यामध्ये दुरुस्ती करून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

प्रशासनाच्या वतीने सध्या मतदार यादी अद्ययावत करण्याचे तसेच मतदारांचे मॅपिंग करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या परिसरातील बीएलओ यांची भेट घेऊन मतदार यादीतील नाव, पत्ता

**● मतदारांनी काय करावे ?**

मतदार संघाचे नाव व क्रमांक तपासणे.
मतदार यादीतील भाग क्रमांक शोधणे.
अनुक्रमांक पडताळून पाहणे.

**● आवश्यक कागदपत्रे**

आधार कार्ड.
मोबाईल क्रमांक.
नुकताच काढलेला पासपोर्ट फोटो.

व इतर माहिती योग्य आहे का याची खात्री करून घ्यावी. आवश्यक कागदपत्रांसह मॅपिंग प्रक्रिया पूर्ण केल्यास भविष्यात मतदानाच्या वेळी कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, असेही सभापती निजाम शेख यांनी नमूद केले.

विशेषतः ज्या नागरिकांची नावे २००२ मधील मतदार यादीत नोंद होती त्यांनी आपली माहिती तपासणे आवश्यक आहे. विवाहित महिलांनी आपल्या आई-वडील किंवा आजी-आजोबा यांच्या मतदार यादीतील भाग क्रमांक व अनुक्रमांक शोधणे गरजेचे आहे. यामुळे माहिती पडताळणी प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

नागरिकांना मतदार यादीतील माहिती शोधण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नागरिकांनी खालील संकेतस्थळावर जाऊन राज्य, जिल्हा, मतदारसंघ, मतदाराचे नाव आणि कॅप्चा भरून आपली माहिती तपासू शकतात.

संकेतस्थळ https://voters.eci.gov.in/searchInSIR मतदारांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण केल्यास मतदान प्रक्रियेत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. तसेच मतदार यादी अधिक पारदर्शक आणि अचूक राहण्यास मदत होईल. त्यामुळे शहरातील सर्व नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सभापती निजाम शेख यांनी केले आहे.

# ठिबक-तुषार वितरकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्रित पोर्टलची मागणी

## महाराष्ट्र राज्य ड्रीप डीलर असोसिएशनची राज्यस्तरीय बैठक उत्साहात

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य ड्रीप डीलर असोसिएशनच्या वतीने कोल्हापूर येथे आयोजित राज्यस्तरीय ठिबक व तुषार वितरकांची बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने ठिबक व तुषार सिंचन वितरक या बैठकीस उपस्थित होते. बैठकीत वितरकांना भेडसावत असलेल्या अडचणी, अनुदान प्रक्रिया तसेच ऑनलाईन प्रणालीतील त्रुटींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीचे अध्यक्षस्थान असोसिएशनचे अध्यक्ष इंजि. सुदामजी खोसरे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे नियोजन पश्चिम महाराष्ट्र व कोकण विभाग प्रमुख शैलेश लंबे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या बैठकीस कृषी विभाग व मायक्रो इरिगेशन क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यामध्ये डीबीटी विशेषज्ञ (अधीक्षक कृषी अधिकारी) सागर खटकाळे, महाराष्ट्र मायक्रो इरिगेशन मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे



अध्यक्ष झुंबरलाल भंडारी, मायक्रो इरिगेशन मॅन्युफॅक्चर असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष कृष्णात महामुलकर तसेच जैन इरिगेशनचे प्रतिनिधी एस. एन. पाटील यांचा समावेश होता. या मान्यवरांनी ठिबक व तुषार सिंचन योजनांच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. बैठकीदरम्यान वितरकांनी शासनासमोर विविध मागण्या मांडल्या. त्यामध्ये ठिबक व तुषार वितरकांचे स्टॉक बुक ऑनलाईन उपलब्ध करणे, वितरक नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन करणे, शेतकऱ्यांचा ड्रॉ वेळेत काढणे, मंजूर अनुदान वेळेत वितरित करणे तसेच शेतकऱ्यांच्या अनुदानाचा डेटा ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध करून देणे या प्रमुख मागण्यांचा समावेश होता. तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा तात्काळ सुरू करावा, महाडीबीटी व अन्य पोर्टलवरील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि तुषार सिंचन अनुदानासाठी किमान क्षेत्र मर्यादा २० गुंठ्यांवरून १० गुंठे करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

सध्या शेतकऱ्यांच्या अनुदान प्रक्रियेसाठी महाडीबीटी पोर्टल, सिंचन प्रणाली डेटा आणि अनुदान वितरणासाठी स्वतंत्र प अशा तीन वेगवेगळ्या प्रणाली वापरल्या जात असल्यामुळे प्रक्रियेत विलंब होत असल्याचे वितरकांनी सांगितले. त्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया एका एकत्रित पोर्टलवर आणण्याची मागणी बैठकीत करण्यात आली. तपासणी प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणीही या वेळी करण्यात आली. सध्या ठिबक व तुषार सिंचन तपासणीसाठी कृषी सहाय्यक आणि कृषी पर्यवेक्षक अशी दोन स्तरांवर व्यवस्था आहे. प्रत्यक्ष तपासणी कृषी पर्यवेक्षकांकडून होत असतानाही ऑनलाईन प्रक्रियेत कृषी सहाय्यकांकडून प्रस्ताव परत पाठवले जात असल्याची तक्रार वितरकांनी केली. त्यामुळे या कामासाठी फक्त कृषी पर्यवेक्षकांचीच अधिकृत नेमणूक करावी, अशी मागणी करण्यात आली. बैठकीस प्रमोद बायस्कर, पांडुरंग शिंदे, गणेश पाटील, शिवाजी वायाळ, सोपान पाटील, विवेक भामरे, प्रमोद पडवळ, प्रशांत चौधरी, मारुती पवार, शरद गोरे, भाऊसाहेब लवटे, सखाराम वायभट यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील वितरक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय महिला परिषदेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व – ग्रामपंचायत अधिकारी ज्योती लेकुरवाळे यांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ग्रामपंचायत अंथरवणपिंपरी (ता. बीड) येथील ग्रामपंचायत अधिकारी ज्योती लेकुरवाळे यांना राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाला आहे. भारत सरकारतर्फे ११ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित राष्ट्रीय महिला परिषदेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची मानाची संधी त्यांना मिळाली. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर महिलांच्या सक्षमीकरणासाठी ज्योती लेकुरवाळे यांनी विविध उपक्रम राबवले आहेत.



स्वयंसहायता गटांचे बळकटीकरण, ग्रामसभांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग वाढवणे, पारदर्शक प्रशासनाची अंमलबजावणी तसेच स्थानिक समस्यांचे प्रभावी निराकरण या माध्यमातून अंथरवणपिंपरी ग्रामपंचायतीच्या विकासाला गती मिळाली आहे. त्यांच्या या कामगिरीची दखल घेऊन राष्ट्रीय महिला परिषदेसाठी त्यांची निवड करण्यात आली. या परिषदेत सहभागी होण्यापूर्वी त्यांनी यशदा येथे पंचायत नेत्री प्रशिक्षक म्हणून विशेष प्रशिक्षण पूर्ण केले. या प्रशिक्षणात उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी तसेच सत्र संचालक स्नेहा देव यांचे मार्गदर्शन लाभले. पंचायत प्रशासनातील महिलांचे नेतृत्व, निर्णयक्षमता, सहभागात्मक विकास आणि सक्षमीकरणाच्या प्रभावी पद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन या प्रशिक्षणात देण्यात आले. राष्ट्रीय महिला परिषदेत देशभरातील निवडक सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व तज्ज्ञ सहभागी झाले होते. विविध राज्यांतील यशस्वी उपक्रमांची देवाणघेवाण, महिलांसाठी धोरणात्मक उपाययोजना आणि पंचायत राज संस्थांमधील नेतृत्व विकास या विषयांवर सखोल चर्चा झाली. या व्यासपीठावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना ज्योती लेकुरवाळे यांनी राज्यातील यशस्वी उपक्रमांची प्रभावी मांडणी केली. या निवडीमुळे बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पंचायत समिती बीडचे गटविकास अधिकारी सानप साहेब, विस्तार अधिकारी शेळके साहेब, ग्रामपंचायत अंथरवणपिंपरीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना रोटरी क्लब ऑफ बीडचा चंपावतीरत्न पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने देण्यात येणारा मानाचा चंपावतीरत्न पुरस्कार यंदा राज्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना देण्यात येणार आहे. दि.२२ मार्च रोजी हॉटेल निलकमल मध्ये ग्लोबल विकास ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी मयंक गांधी आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे गव्हर्नर रो सुधीर लातुरे यांच्या हस्ते प्रदान



करण्यात येईल. याप्रसंगी रोटरीचे डिस्ट्रिक्ट लर्निंग फ़ेसीलेटर रो ओम मोतीपवळे रोटरी माजी गव्हर्नर रो हरीश मोटवाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. बीड शहराच्या शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणार्या जनमान्य व्यक्तींना हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. यापूर्वी हा पुरस्कार अभिनेते मकरंद अनासपुरे, स्व.केशरबाई क्षीरसागर, वे.शा.स.धुंडीराज महाराज पाटांगणकर, श्रीहरी तुंगार, रामप्रसाद राठी, स्व.मोतीराम वरपे, डॉ.श्रीहरी लहाने, सुभाषचंद्र सारडा, शिवाजीराव पंडित, स्व.नामदेव क्षीरसागर आदी मान्यवरांना देण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्यास शहरातील सर्वच सामाजिक आणि सेवाभावी संस्थेतील सदस्यांनी तसेच नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रोजेक्ट चेअरमन सी.ए.सुरेश लड्डा, रोटरी क्लब अध्यक्ष विकास उमापूरकर, सचिव सुमित जैस्वाल यांनी केले आहे.